# -:: प्रेसनोट ::-

## पायधुनी पोलीस ठाणे कडून पोक्सो कायदयातील अपराधी दोषशाबित केल्याबाबत.

पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई येथे दाखल गु.नों.क्र. २६१/२०१९ कलम ३५४,३५४(ड) भा.द.वि. सह ८,१२ पोक्सो कायदा मधील आरोपी नामे **जमील शकुर शेख वय ३१ वर्ष** याने दिनांक २५/११/२०१९ रोजी रात्रौ ९.३० वा सुमारास कॉलेजला जाणारी १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा सतत पाठलाग करून ती राहत असलेल्या बिल्डीग जवळ पोहचला व त्याने सदर मुलीच्या पाठीमागुन येवुन बळाचा वापर करून तीचा उजवा हात पकडला. त्यामुळे सदर मुलीचा सविस्तर जबाब नोंद करुन स/न प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान आरोपी नामे **जमील शकुर शेख वय ३१ वर्ष** धदा- हमाली रा.ठी - सेट्रल हॉटेल जवळील फुटपाथ, मोहमंद अली रोड, मुंबई - ०३ यास अटक करण्यात आली असुन त्याचेविरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. सदर गुन्हयाची सुनावणी मा. श्रीमती भारती काळे, कोर्ट क्र.१८,विशेष पोस्को न्यायालय, सेशन कोर्ट यांच्या खंडपीठासमक्ष सुरू होती. सदरबाबत मा.विशेष सरकारी अभियोक्ता म्हणुन श्रीमती सुलभा जोशी यांनी युक्तीवाद केला असुन मा. न्यायालयाने दिनांक २३/०९/२०२१ रोजी सदर खटल्यास अनुसरून आरोपी जमील शकुर शेख यास पोक्सो कायदा कलम १२ व भारतीय दंडविधान संहिता कलम ३५४(ड) अंतर्गत दोषी शाबित केले आहे. तसेच आरोपीविरोधात पुढीलप्रमाणे शिक्षा सुनावली आहे.

- दोन वर्षे कठोर कारावासाची शिक्षा आणि रू. ५,०००/- द्रव्यदंड. जर द्रव्यदंड भरला नाही तर आणखी एक महिने कठोर कारावासाची शिक्षा. तसेच अपील कालावधी पुर्ण झाल्यावर द्रव्यदंडाच्या रकमेपैकी रू. ४०००/- एवढीच रक्कम बळीत मुलीला नुकसान भरपाई म्हणुन दयावी.

नमुद गुन्हयातील तपासी अधिकारी यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार सदर गुन्हयातील आरोपींच्या विरोधात मा. सत्र न्यायालय येथे आवश्यक ते पुरावे व साक्षीदार हजर करून अटक आरोपीस दोषी शाबित केले आहे. सदरची कामगिरी मा. श्री. शरद नाईक, सहाय्यक पोलीस आयुक्त, पायधुनी विभाग, पायधुनी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुभाष दुधगांवकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. कलीम शेख, महिला पोलीस उप निरीक्षक ज्योत्स्ना भावसार, पैरवी अधिकारी पोलीस उप निरीक्षक श्यामसुंदर मुणगेकर आणि महिला पो.ना.क्र. ०४०४६१/कल्पना भरसाट, पो.शि.क्र. १३०४२८/ संतोष केदार यांनी केली असुन सदर कामगिरीचे मा. श्री विश्वास नांगरे पाटील सो, पोलीस सह आयुक्त ( का. व सु. ), मा. श्री. दिलीप सावंत, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मा.श्री. सौरभ त्रिपाठी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २, अतिरीक्त कार्यभार यांनी अभिनंदन करून कौतुक केले आहे.

-----------------